# <u>प्रेस नोट</u>

## मुंढवा पोलीस ठाणे कडील एम.पी.डी.ए अंतर्गत कारवाई

मुंढवा पोलीस ठाणे कडील रेकॉर्ड वरील गुन्हेगार नामे श्रीकांत ऊर्फ शिरक्या राजु जाधव वय.२० रा.स.नं.९४, सर्वोदय कॉलनी, मुंढवा, पुणे याचे विरुध्द मुंढवा पोलीस ठाणे येथे एकुण ८ गुन्हे दाखल असुन त्यापैकी प्राणघातक अग्नी शस्त्रानिशी खुनाचा प्रयत्न करणे, प्राणघातक शस्त्राचा धाक दाखवुन मौल्यवान वस्तु लुटने, घरफोडी चोरी करणे अशा प्रकारचे गंभीर स्वरुपाचे गुन्हे केलेले आहेत. त्याच्या गंभीर कृत्यांना प्रतिबंध करण्यासाठी त्याचेविरुध्द महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६(अ)(ब) प्रमाणे २ वर्षा करीता पुणे शहर व पुणे जिल्हयातुन तडीपार करणेत आले होते. तडीपार आदेशाचा कालावधी चालु असताना, त्याने तडीपार आदेशाचा भंग केला व जबरी चोरी, बेकायदेशीर घातक शस्त्र बाळगणे यासारखे गुन्हे केले आहेत. याप्रमाणे त्याचेवर प्रतिबंधक कारवाई करुन देखील त्याचे गुन्हेगारी वृत्तीमध्ये कोणताही बदल न झालेने व त्याचे समाज विघातक कृत्य सार्वजनीक सुव्यवस्थेस बाधा आणणारा आहे. यावरुन मा. पोलीस आयुक्त सो. पुणेशहर यांनी गुन्हेगार नामे श्रीकांत ऊर्फ शिरक्या राजु जाधव वय.२० रा.स.नं.९४, सर्वोदय कॉलनी, मुंढवा, पुणे याचेविरुध्द महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड,हातभट्टीवाले, औषधी द्रव्यविषयक गुन्हेगार, धोकादाखक व्यक्ती, दृक्श्राव्य कलाकृतीची विनापरवाना प्रदर्शन करणारे व्यक्ती (व्हिडीओ पायरेट्स), वाळुची तस्करी आणि अत्यावश्यक वस्तुंचा काळा बाजार करणाऱ्या व्यक्ती यांच्या विघातक क्त्यांना आळा घालण्याबाबतचा अधिनियम, १९८१ चे कलम ३(३) अन्वये दि. २२/०१/२०१८ रोजी स्थानबध्द करुन त्यास येरवडा कारागृह, पुणे येथे ठेवण्यात आले आहे.

**नमुद स्थनबध्द आरोपी हा सर्वोदय कॉलनी, मुंढवा येथील रहिवाशी असुन सदर ठिकाणचा हा पहिला एमपीडीए असुन यापुढेही अशा प्रकारचे गुन्हे करणाऱ्यांविरुध्द या स्वरुपाची कडक कारवाई करण्यात येणार आहे.**

वरील कारवाई मा.रश्मि शुक्ला पोलीस आयुक्त सो. पुणेशहर, मा.रविंद्र कदम, पोलीस सह-आयुक्त सो. पुणेशहर, मा.रविंद्र शेनगावकर, अप्पर पोलीस आयुक्त सो.दक्षिण प्रादेशिक विभाग, पुणेशहर, मा.प्रदिप देशपांडे, अप्पर पोलीस आयुक्त सो.उत्तर प्रादेशिक विभाग, पुणेशहर, मा. दिपक साकोरे, पोलीस उप आयुक्त सो परि-४ पुणेशहर, मा.मिलिंद पाटील सहा पोलीस आयुक्त सो. पुणेशहर यांचे मागदर्शनाखाली व आदेशान्वये वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पात्रुडकर, पोलीस निरीक्षक(गुन्हे) श्री महेंद्र जगताप, पोउपनिरी गवळी मुंढवा पोस्टे पुणे, पोउपनिरी पोळ, सहापोफौ भोसले पीसीबी गुन्हे शाखा पुणेशहर, पोहवा २०३९ चव्हाण, पोशि ८१८१ शिंदे मुंढवा पोलीस ठाणे पुणेशहर यांनी योग्यत्या कागदपत्राची पुर्तता करुन वरील कारवाई केली आहे.